महाराष्ट्र शासन

# भूमि अभिलेख विभाग

## सरळसेवा भरती २०२१

## छाननी अर्ज भरण्याकरीता सविस्तर मार्गदर्शक सुचना

भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकामी दिनांक ०९/१२/२०२१ रोजी http://landrecordsrecruitment२०२१.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर परिक्षेकरीता एकूण ७६३७१ अर्ज प्राप्त झालेले आहेत. परंतु भूमि अभिलेख विभागाचे भरतीचे काम ज्या कंपनीमार्फत करण्यात येणार होते, त्या कंपनीद्वारे इतर विभागांकरीता घेण्यात आलेल्या विविध परिक्षांबाबत गैरप्रकार उघडकीस आल्याने या विभागाचे पदभरतीबाबत केवळ नोंदणीची सुरु केलेली प्रक्रिया सदर कंपनीमार्फत राबविण्यात आलेली आहे.

सदर कंपनीमार्फत दिनांक ३१/१२/२०२१ अखेर ऑनलाईन स्वरुपात स्विकारण्यात आलेल्या एकूण ७६३७१ अर्जांचा डाटा कंपनीकडून कार्यालयास प्राप्त झालेला आहे. कंपनीकडून प्राप्त झालेल्या डाटाची छाननी करताना खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या -

१. दिनांक ०९/१२/२०२१ रोजी भूमि अभिलेख विभागातील पदभरतीकामी ६ विभागांची (पुणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपुर) जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती व एका अर्जदाराने कोणत्याही एकाच विभागातून अर्ज भरणे आवश्यक होते. परंतु ऑनलाईन अर्ज भरताना एकाच उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास येत आहेत.

२. **भूमि अभिलेख विभागातील भूकरमापक तथा लिपीक या पदाकरीता विहीत केले ल्या सेवाप्रवेश नियमांनुसार केवळ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील सर्व्हेअर व्यवसाय प्रमाणपत्र (I.T.I. Surveyor), स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) किंवा त्यापेक्षा उच्च अर्हता जसे स्थापत्य अभियांत्रिकी पदवी (B.E./B.Tech. Civil) अशी अर्हता धारण करणारे उमेदवार अर्ज सादर करण्यास पात्र आहेत.** परंतु कंपनीकडून प्राप्त डाटा पाहता उक्त अर्हता धारण न करणाऱ्या उमेदवारांनी देखील अर्ज दाखल केलेले दिसून येत आहेत.

३. काही उमेदवारांनी छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करताना योग्य पद्धतीने अपलोड केल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त कारणास्तव विभागाने ऑनलाईन अर्ज स्विकृती द्वारे प्राप्त अर्जांमधून अर्हता धारण करणारे व पात्र उमेदवार निवडीकरीता खालील प्रक्रिया राबविणेचे ठरविले आहे. छाननी अर्ज भरताना खालील कार्यपद्धतीचा अवलंब करावा.

I. सर्व प्रथम उमेदवारांनी यापुर्वी भरलेल्या अर्जाच्या नोंदणी क्रमांकाद्वारे (उदा. DLR२१*******) लॉगीन करावे.उमेदवाराने भरलेला नोंदणी क्रमांक चुकीचा असल्यास त्याला पुढील कार्यवाही करता येणार नाही.

II. त्यानंतर यापुर्वी नोंदणी करताना / अर्ज भरताना नोंदविलेली जन्म दिनांक व आधार क्रमांक / आधार नोंदणी क्रमांक (Aadhar Enrollment no.) भरावा. उमेदवाराने भरलेला नोंदणी क्रमांक, जन्म दिनांक व आधार क्रमांक ही माहीती विभागाकडे उपलब्ध माहितीसोबत न जुळल्यास त्याला छाननी अर्ज भरण्याची पुढील कार्यवाही करता येणार नाही.

III. उपरोक्त माहिती भरल्यानंतर उमेदवारास नविन पासवर्ड निश्चित (Set) करावयाचा आहे.

IV. पासवर्ड बदलल्यानंतर उमेदवाराने नविन पासवर्ड आधारे लॉगीन करावे. उमेदवाराने नविन पासवर्ड लक्षात ठेवण्याची जबाबदारी त्याची स्वत:ची असेल. सदरचा नविन पासवर्ड कोणत्याही परिस्थितीत पुन्हा बदलता येणार नाही. या पुढील सर्व प्रक्रिया या नविन पासवर्डच्या आधारे करण्याची असल्यामुळे पासवर्ड अतिशय काळजीपुर्वक लक्षात ठेवावा.

V. संकेतस्थळावर सुचनांच्या खाली "**छाननी अर्ज भरण्यासाठी येथे क्लीक करावे**" या बटनावर क्लीक करावे. तसेच एकदा पासवर्ड निश्चित (Set) केल्यानंतर प्रक्रिया पुर्ण न करता बाहेर पडल्यास छाननी अर्ज भरण्याकरीता "Login" या बटनावर क्लीक करावे.

VI. नविन पासवर्ड द्वारे लॉगीन केल्यानंतर आपणांस पुर्वी भरलेल्या अर्जाची माहिती दिसेल.

VII. सदर माहिती मध्ये उमेदवाराचे छायाचित्र व सही सुस्पष्ट दिसत नसल्यास दिलेल्या ठिकाणी उमेदवाराने त्याचा फोटो व सही अपलोड करावी. अपलोड करावयाचे छायाचित्र सुस्पष्ट व अलीकडच्या काळातील असावे. (छायाचित्र file size 50kb to 100kb, स्वाक्षरी file size 20kb to 50kb). छायाचित्र व स्वाक्षरी सुस्पष्ट दिसत असल्यास अशा उमेदवारांनी छायाचित्र व स्वाक्षरी नव्याने अपलोड करण्याची आवश्यकता नाही.

VIII. त्यानंतर उमेदवाराने त्याचे शैक्षणिक अर्हतेची माहिती भरावयाची आहे. (सदर पदाकरीता माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील सर्व्हेअर व्यवसाय प्रमाणपत्र (I.T.I. Surveyor) किंवा स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) किंवा त्यापेक्षा उच्च अर्हता जसे स्थापत्य अभियांत्रिकी पदवी (B.E./B.Tech. Civil) अर्हता विहीत केलेली आहे)

वरील अर्हता धारण करत नसताना देखील अर्ज दाखल केला असल्यास अशा उमेदवारांचा अर्ज रद्द करण्यात येणार असून त्यांच्या शुल्काचा परतावा विभागाकडून त्यांनी दिलेल्या बँक खात्यावर करण्यात येणार आहे.

IX. उमेदवाराने वर नमुद अर्हता धारण करीत असल्याबाबत मान्यताप्राप्त संस्थेकडील प्रमाणपत्र संकेतस्थळावर पुरविलेल्या ठिकाणी अपलोड करावयाचे आहे. (file format pdf, file size 300 kb to 1mb)

X. विहीत अर्हता धारण करीत नसताना देखील ज्या उमेदवारांनी अर्ज दाखल केला असेल असे उमेदवार परिक्षेस बसण्यास अपात्र असतील. अशा उमेदवारांना त्यांनी भरलेल्या शुल्काचा परतावा देण्यात येणार असल्याने त्यांनी त्यांच्या बँक खात्याचा तपशील (खाते क्र., बँकेचे नाव, शाखा, आयएफएससी कोड) संकेतस्थळावर विहीत केलेल्या ठिकाणी भरावा.

XI. उमेदवाराने शुल्क परताव्याचा पर्याय निवडून बँकेचे तपशील सादर केल्यानंतर त्याला कोणत्याही परिस्थितीत परिक्षेकरीता छाननी अर्ज सादर करता येणार नाही. तसेच उमेदवाराने सादर केलेल्या बँक तपशीलानुसार शुल्क परताव्याची कार्यवाही केली जाणार असल्यामुळे उमेदवारांनी बँकेचे तपशील काळजी पुर्वक भरावेत. त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची असेल.

XII. भूमि अभिलेख विभागातील ६ विभागांकरीता एकाच वेळी एकच परिक्षा होणार आहे व त्यानुसार विभागनिहाय रिक्त पदांनुसार गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांनी एकापेक्षा अधिक विभागांमधून अर्ज दाखल केलेले आहेत अशा उमेदवारांनी नविन पासवर्ड निश्चित केल्यानंतर त्यांनी जेवढे अर्ज दाखल केले असतील त्या अर्जांचे नोंदणी क्रमांक (Registration Id)दिसतील. त्यापैकी जो अर्ज अंतिम करायचा असेल असा एकच अर्ज क्रमांक काळजीपुर्वक निवडण्याचा आहे.

XIII. (a) एकापेक्षा अधिक अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांनी जेवढे अर्ज भरले आहेत, **त्या प्रत्येक नोंदणी क्रमांकानुसार लॉगीन करुन जो अर्ज अंतिम करायचा असेल असा एकच अर्ज काळजीपुर्वक निवडणेचा आहे.**

(b) **प्रत्येक नोंदणी क्रमांकानुसार लॉगीन करुन एकच अर्ज निवडणेचा असल्याने एखाद्या उमेदवाराने दोन वेगवेगळे अर्ज क्रमांक निवडल्यास त्याचे सर्व अर्ज रद्द समजण्यात येतील.**

उदा. एखाद्या उमेदवाराने खालील क्रमांकाद्वारे अर्ज दाखल केलेले आहेत.

१) DLR२११५०१

२) DLR२११५०२

३) DLR२११५०३

४) DLR२११५०४

वरील उमेदवाराने DLR२११५०१ या नोंदणीक्रमांकानुसार लॉगीन केल्यास त्याला उक्त चारही अर्जांचे नोंदणी क्रमांक दिसतील. सदर अर्जांपैकी कोणता अर्ज अंतिम करायचा आहे असा अर्ज निवडावा. (उदा. DLR२११५०३).

त्यानंतर वरील चारही नोंदणी क्रमांकानुसार लॉगीन करुन DLR२११५०३ हाच अर्ज निवडावा. एखाद्या उमेदवाराने दोन वेगवेगळ्या नोंदणी क्रमांकानुसार लॉगीन करुन दोन वेगवेगळे अर्ज निवडल्यास त्याचे सर्व अर्ज बाद ठरविण्यात येतील व त्याला पुढील छाननी अर्ज भरण्याची कार्यवाही करता येणार नाही. त्यामुळे जो अर्ज अंतिम करायचा आहे असा एकच अर्ज काळजीपुर्वक निवडण्याची दक्षता उमेदवाराने घेणे आवश्यक आहे. छाननी अर्ज भरण्याबाबतची कार्यवाही केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत कुठल्याही बदल करता येणार नाही.

त्यानंतर निवडलेल्या (उदा. DLR२११५०३) या Registration Id वर लॉगीन करुन अ.क्र. I ते XI मधील सुचनांनुसार कार्यवाही करावी.

उमेदवारांनी एकापेक्षा अधिक ठिकाणी खोटी माहिती देवून डमी उमेदवार परिक्षेसाठी निवडल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांना राहतील, याची नोंद घ्यावी.

महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मातंसं-२०२२/प्र.क्र.०१/से-२/३९, दिनांक १८/०१/२०२२ अन्वये पदभरतीसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठी सध्या असलेल्या OMR Vendor कंपन्यांचे पॅनेलला स्थगिती देण्यात येवून पदभरतीकामी TCS/ IBPS / MKCL सारख्या कंपन्यांच्या मार्फत परिक्षा घेण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरू आहे.

भूमि अभिलेख विभागाचे पदभरतीबाबतची परिक्षा वरील तीन पैकी एका कंपनीमार्फत Online पद्धतीने (CBT- Computer Based Test) घेण्याकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांनी दिनांक ०९/१२/२०२१ ते ३१/१२/२०२१ या कालावधीत ऑनलाईन अर्ज दाखल केले असतील व परिक्षा शुल्क भरले असेल अशा उमेदवारांपैकी जे उमेदवार छाननी अर्ज भरण्याची प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर पात्र ठरतील त्यांना Online परिक्षा द्यावी लागणार आहे व त्या परिक्षेसाठी निश्चित करण्यात आलेले वेळापत्रक विभागाच्या https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

सदर Online परिक्षेकरीता उपलब्ध होणारे परिक्षा केंद्र जिल्हा अथवा तालुका स्तरावर देखील निर्धारीत करण्यात येतील. त्यामुळे परिक्षार्थींनी आपण निवडलेले विभाग व त्या अंतर्गत येणारे जिल्हे या ठिकाणी दिलेल्या वेळेत उपस्थित रहाणे आवश्यक आहे. यामध्ये बदल करण्याचे अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडे असणार आहेत. याबाबत उमेदवारांची परिक्षा केंद्र बदलुन देण्याची विनंती मान्य केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.